**दिनांक 05.07.2014 रोजी दुपारी 12.00 वाजता जिल्हाधिकारी, गोंदिया यांचे दालनात नवेगावबांध राष्ट्रीय उदयानातील गावांचे पुनर्वसनाबाबत झालेल्या सभेचा कार्यवृत्तांत**

| अ.क्र. | मुददा | निर्णय |
|---|---|---|
| 1 | 2 | 3 |
| I. | दिनांक 30.01.2014 रोजी झालेल्या सभेचे कार्यवृत्तांतानुसार करण्यात आलेली कार्यवाही | दिनांक 30.01.2014 रोजी झालेल्या सभेतील मुददे खालील मुददयांमध्ये समाविष्ठ असल्याने वेगळयाने चर्चा करण्यात आलेली नाही. |
| II. | **पुनर्वसित लोकांचे मागण्या** | |
| 1. | पुनर्वसित क्षेत्रात नवीन शाळेचे बांधकाम करणे | पुनर्वसित क्षेत्रात नवीन शाळेचे बांधकाम सुरु आहे. |
| 2. | पुनर्वसित क्षेत्रात दोन आंगणवाडी इमारतीचे बांधकाम करणे | पुनर्वसित क्षेत्रात दोन आंगणवाडी इमारतीचे बांधकाम सुरु आहे. |
| 3. | पुनर्वसित क्षेत्रात समाज मंदीराचे बांधकाम करणे | पुनर्वसित क्षेत्रात समाज मंदीराचे बांधकाम करण्याकरीता अतिरिक्त केंद्रीय सहाय निधी (ACA) अंतर्गत तत्वत: मान्यता प्रदान करण्यात आलेली असुन जिल्हाधिकारी, गोंदिया यांचेकडुन प्रशासकीय मान्यता प्रदान केल्यानंतर बांधकाम करण्याची कार्यवाही करण्यात येईल. |
| 4. | पुनर्वसित क्षेत्रात शिल्लक रस्त्यांचे बांधकाम करणे | पुनर्वसित क्षेत्रात शिल्लक रस्त्यांचे बांधकाम म.ग्रा.रो.ह.यो अंतर्गत सुरु आहेत. |
| 5. | पुनर्वसित क्षेत्रात शिल्लक नाल्यांचे बांधकाम करणे | पुनर्वसित क्षेत्रात शिल्लक नाल्यांचे बांधकाम करण्याकरीता अतिरिक्त केंद्रीय सहाय निधी (ACA) अंतर्गत तत्वत: मान्यता प्रदान करण्यात आलेली असुन जिल्हाधिकारी, गोंदिया यांचेकडुन प्रशासकीय मान्यता प्रदान केल्यानंतर बांधकाम करण्याची कार्यवाही करण्यात येईल. |
| 6. | पुनर्वसीत झालेल्या लोकांना प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र देण्याबाबत. | सदर प्रकल्पग्रस्त प्रमाणाकरीता आवश्यक कागदपत्रे सादर करण्याकरीता संबंधित गावक-यांना कळविण्यात आलेले असुन त्यांचे कडुन अदयापही कागदपत्रे प्राप्त झालेली नाहीत. आवश्यक कागदपत्रे प्राप्त झालेनंतर पुढील कार्यवाही जिल्हाधिकारी, गोंदिया यांचे कार्यालयामार्फत करण्यात येईल. |
| 7. | कवलेवाडा येथिल 14, कालीमाती येथिल 23 व मौजा कोकणा येथिल 9 असे एकुण तीन गांवातील 46 लोकांना वनहक्क कायदा 2006 अंतर्गत नियमित झालेल्या अतिक्रमीत जमीन एकुण 23.415 हेक्टर आर जमिनीचा मोबदला देण्याबाबत. | सदर लोकांना जमीनीचा मोबदला देण्याकरीता मौजा सौंदड येथिल जागेची (वनजमीन) निवड करण्यात आलेली आहे. तथापी सदर जागा लोकांना देण्याकरीता सदर जागेचे वनसंवर्धन अधिनियम 1980 अंतर्गत प्रस्ताव तयार करुन केंद्र शासनाकडुन मान्यता प्राप्त करणे आवश्यक आहे तथापी सदर कायदयाअंतर्गत प्रस्ताव सादर करण्याकरीता संबंधित ग्रामसभेचे ठराव आवश्यक आहे परंतु मौजा सौंदड येथिल गावक-यांनी ठराव नकारात्मक दिलेला असल्याने सदर बाबतीत विशेष बाब म्हणुन पुनर्वसित लोकांना FRA 2006 अंतर्गत मिळालेल्या अतिक्रमीत जमीनीच्या बदल्यात जमीन देण्याकरीता ग्रामसभा ठरावाशिवाय वनंसवर्धन अधिनियम 1980 अंतर्गत प्रस्ताव सादर करण्यात यावे, असे ठरविण्यात आलेले आहे. |

उपवनसंरक्षक
गोंदिया वनविभाग, गोंदिया